**सह्याद्रीतील शेतीची दुरवस्था**

'हरित क्रांती'च्या नावाने औद्योगिक शेतीचे प्रारूप देशात रुजवण्यात आले, पण ते मुळातच ठराविक प्रदेशासाठी नियोजित होते. हजारो वर्ष जोपासलेली सुपीक जमीन, बारमाही मुबलक पाणी आणि सुयोग्य हवामान असलेल्या पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग, हे प्रदेश या साठी खास निवडलेले होते. या सर्व प्रदेशांमध्ये त्यासाठी आवश्यक लोकशिक्षण, सरकारी यंत्रणेचे पाठबळ, निविष्ठांचा पुरवठा – अगदी हमीभावाने खरेदी पर्यंत सगळी अद्ययावत व्यवस्था उभी करण्यात झाली.

मात्र महाराष्ट्रात आणि इतरत्र खूपच वेगळी परिस्थिती असूनही इथे पण शेवटी हरित क्रांतीचा रेटा आलाच. त्याचे परिणाम देखील आपल्या समोर आहेत. महाराष्ट्रात शेती आणि शेतकरी अगदी मेटाकुटीस आले आहेत.

पण डोंगराळ भागातले प्रश्न आणि इथली परिस्थिती याचा तर कोणीच विचार केलेला दिसत नाही. इथल्या शेतकऱ्यांना ना हरित क्रांती धड कळली, ना फळली, आणि पारंपारिक पीकपद्धती मात्र पुरती हातातून निसटली. तीन महिन्याच्या शेतीवर वर्षभर पोट भरत नाही हे वास्तव तर आहेच. डोंगराळ भागातील शेती ही बव्हंशी कोरडवाहू. भरपूर पाउस पडतो पण पाणी सगळं शेवटी खाली वाहून जातं. उर्वरित काळात उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करणे आणि वर घराघरातून कोणी ना कोणी कायमस्वरूपी शहरी भागात किंवा सिंचन असलेल्या प्रदेशात स्थलांतर करणे ही पद्धतच पडली आहे.

सह्याद्रीतील दक्षिणेच्या भागात इंग्रजांनी गेल्या शतकातच चहा, कोफी, रबर अश्या औद्योगिक आणि नगदी पिकांची मोठ्या क्षेत्रावर शेती सुरु केली. यामुळे थेट तिथल्या रहिवाश्यांना रोजगार तरी मिळाला. पण महाराष्ट्रात मात्र हे झाले नाही. इथल्या सह्याद्रीत मोठ्या प्रमाणात धरणे बांधून त्यातील पाण्यावर मोठी शहरे, औद्योगिक वसाहती आणि ऊस शेती असा फॉर्म्युला वापरण्यात आला. त्यासाठी सह्याद्रीतील शेकडो दऱ्या बुडवण्यात आल्या, हजारो वर्षांपासून तिथे वसलेले आदिवासी पाडे आणि शेती करणारी संपूर्ण गावं बुडाली, परिणामी लाखो माणसं विस्थापित झाली. म्हणजे विकासाच्या या पॅटर्न मध्ये प्रत्यक्ष सह्याद्रीतल्या रहिवाश्यांच्या पदरी पडलं ते फक्त नुकसान आणि आश्वासने. खरा फायदा झाला तो मुंबई, ठाणे ई. नागरी केंद्रांचा आणि सबंध पश्चिम महाराष्ट्राचा.

आजतागायत सह्याद्रीमध्ये जो शेतकरी तग धरून बसला आहे, त्याची फार दयनीय अवस्था आहे. इथल्या हवामानात फक्त पावसाळी पीक घेणे शक्य आहे – पण ते अतिशय जिकीरीचे आणि अंगमेहनतीचे. कोरडवाहू शेतीमध्ये सध्या पारंपारिक पिकांपैकी भात आणि थोडीफार नाचणी शिल्लक आहे. भुईमुग, तूर, रताळे, कारिळा, जोंधळा, वरई व इतर भरड धान्ये अशी अनेक जुनी पिके पाहता पाहता इतिहासजमा होऊ लागली आहेत. विविध प्रकारचे कंद आणि रानभाज्या, औषधी वनस्पती या सर्वांची थोडीफार ऐकीव माहिती आजच्या कर्त्या शेतकऱ्याला आहे, तरूण पिढीला माहितीच नाही असं म्हणलं तरी वावगं ठरणार नाही. ज्याच्याकडे कुठून तरी (नदी, बोअर ई) पाणी उपलब्ध होतं तो तत्काळ शक्य तितक्या जमिनीवर ऊस लावतो आणि अजून एका सापळ्यात अडकतो.

===========================================================================

**सर्वांचा लाडका सापळा : ऊस**

ऊसाचे सर्वांना मनोमन पटलेले आणि भावलेले फायदे खालीलप्रमाणे:

१. ग्राहक ठरलेला असतो (साखर कारखाना)
२. शेतकऱ्याची डोकेदुखी फक्त पिक तयार करण्यापर्यंत आहे, तयार ऊस तोडायला कारखान्याची टोळी येते.
३. विकायचा दर ठरलेला असतो – नेमके किती पैसे मिळणार याचा अंदाज असतो.
४. ऊस पिकाला भरपूर पाणी पाजणे आणि वेळोवेळी रासायनिक खताचे डोस देणे या व्यतिरिक्त फार काही करावे लागत नाही. उगवण झाली की तशी दीड वर्ष फुरसत.

५. सर्वात आकर्षक ‘फायदा’ – पैसे एकरकमी हाती येतात

दुर्दैवाने वास्तव वेगळे आहे.

१. कारखान्यात नोंद केली तरी प्रत्यक्ष ऊस उचलायला आपला नंबर लागणे जिकीरीचे झाले आहे. ऊसाखालचे क्षेत्र इतके वाढते आहे की टोळ्या कमी पडतायत. मग ‘मोठे शेतकरी’, चिट्ठी-वशिलेवाले इतकेच काय, टोळीवाल्या मुकादमाला चहापाणी देणारे आधी, बाकी सगळे लाईनीत वाट बघत बसा. कधी तोडलेला ऊस सुकून जातो, कधी आगी लागून जळून जातो.
२. फडाने भरपूर पाणी पाजून सतत वर्षानुवर्ष ऊस पिक घेऊन जमिनी क्षारपड झाल्या आहेत. पूर्वीचा कस संपला. आता वर्षागणिक रासायनिक खते जास्त घालूनही उत्पादन खालावत चालले आहे.
३. सतत फक्त ऊस केल्याने आता रोगराई पण तळ ठोकून बसली आहे. त्यासाठी कीडनाशकांचा खर्च वाढू लागला आहे.
४. वाढता खर्च आणि घटते उत्पादन – आर्थिक गणित ढासळू लागले आहे. विशेषतः डोंगराळ भागातल्या लाल मातीमध्ये ऊस पिकवायचा अट्टाहास काही फार फायदेशीर नाही. काळ्या मातीच्या तुलनेत लाल मातीला निचरा फार, त्यामुळे पाटाने पाणी खूप जास्त खर्च होते. त्यामानाने कस कमी असल्याने एकूण उत्पादन कमी, शिवाय साखरेचा उतारा पण कमी.
५. ऊस कधी उचलायचा ते कारखाना ठरवतो. उसाचा दर कारखाना ठरवतो. शेतकऱ्यांकडून किती टन ऊस आला ते अंतिम मोजमाप कारखाना ठरवतो. साखरेचा उतारा किती आला ते ही कारखाना ठरवतो. सरते शेवटी उसाचे पैसे किती हप्त्यात आणि कधी द्यायचे ते पण कारखाना ठरवतो. शेतकऱ्यांच्या नशिबी फक्त मिळेल ते, मिळेल तेव्हा निमुटपणे स्वीकारणे एवढेच शिल्लक राहते.
६. एकरकमी पैसे दिसतात तेव्हा, ‘उसाचे ऐंशी हजार आले’ म्हणायला क्षणभर आनंद नक्कीच होत असेल, पण वर्षभर केलेल्या खर्चाचा हिशोब मात्र फार थोडे शेतकरी मांडतात. खर्च वजा जाता नेमके उत्पन्न किती झाले हे पहायला बहुतांश शेतकरी घाबरतात. नीट लेखाजोखा मांडला तर डोंगराळ भागातली ऊसशेती म्हणजे एक करूण विनोद आहे. शेतकऱ्याने स्वतःची केलेली फसवणूक आहे.

==========================================================================

**बुडत्याला दुधाचा आधार**

एकंदर महाराष्ट्रातील इतर शेतकऱ्यांप्रमाणे, सह्याद्रीमधला शेतकरी देखील सध्या अनेक संकटांच्या चक्रव्युहात सापडला आहे.

१. पिढीगणिक तुकडे पडल्याने वैयक्तिक जमीनधारणा कमी होत गेली आहे.
२. सिंचनाच्या अभाव – पावसाळी शेती झाली की मोलमजुरी हाच पर्याय उरतो.
३. ज्याला सिंचन मिळते तो उसाच्या सापळ्यात अडकतो. इथल्या सर्वसाधारण शेतकऱ्याच्या समजेनुसार ऊस म्हणजे शेतीतला परमोच्च बिंदू. तिथेही जर फसगत होत असेल तर करायचं तरी काय...या विचाराने तो पुरता भांबावून गेला असतो.
४. मग मुलांची लग्न होत नाहीत, म्हणून त्यांना सगळे प्रयत्न करून शहरात नोकरीला पाठवून द्यायचं. दहावी, बारातेरावी शिकलेला होतकरू तरुण घरची जमीन सोडून शहरात वेटर, बिगारी मजुरी, हाउसकीपिंग, वॉचमन, सेक्युरीटी गार्ड वगैरे काम करायला जातो.
५. गावात वयस्कर पिढी शिल्लक राहते. वार्षिक भातशेती कशीबशी चाकरमान्यांना बोलावून, भावकीला सोबत घेऊन पार पडली जाते. झालेले भात बऱ्याच जणांना वर्षभर पुरत नाही. चाकरमाने पण आपला हिस्सा घेऊन जातात. शेवटी रेशनच्या निकृष्ट तांदुळावर गुजराण होते.

मेटाकुटीला आलेला अस्वस्थ शेतकरी मग निरनिराळ्या भम्पक योजना (उदा. महिना पाचशे रुपये भीक घालून त्याला 'महासन्मान' म्हणणे ई.) आणि फसव्या आश्वासनांना बळी पडतो. त्यातले जरा धडपडे आशावादी शेतकरी खाजगी कंपन्यांच्या स्कीम्स कडे ओढले जातात आणि अजून खड्ड्यात पडतात. (उदा. इमू, ससे, कडकनाथ वगैरे पाळा, किंवा सागवान, स्ट्रोबेरी, भीमसेनी कापूर, ॲपल बोर, काळी हळद वगैरे लागवड करा आणि झटपट श्रीमंत व्हा.) 'कृषी पर्यटन' हे असच अजून एक दिवास्वप्न. मुळात 'कृषी'चा पत्ता नाही आणि अगदी सामान्य दर्जाच्या खानावळी, ढाबे आणि लॉज चालवण्याला 'पर्यटन' म्हणायचं. शिवाय या सगळ्या प्रकल्पांना भांडवल लागतं, जे थोड्याच लोकांना मिळतं.

उरलेले वर्ष पोट भरायला मग एकच पर्याय उरतो – ढोरं बाळगणे आणि दूध विकणे. ढोरांसोबत काही शेळ्या आणि कोंबड्या ठेवल्या जातात. त्या गरजेप्रमाणे बाजारात विकल्या की प्रपंच चालतो कसाबसा.

केवळ रोजच्या दुध विक्रीवर कसाबसा उदरनिर्वाह उभा असल्यामुळे त्याला प्राधान्य दिलं जातं, आणि त्यामुळे काही निष्कर्ष आणि कृती आपोआप होतात.

ढोरांना वर्षभर चारा ही सर्वात महत्वाची बाब होते. सरसकट सगळे हायब्रीड बुटके भात पिकवित असल्यामुळे त्यापासून वैरण मिळण्याचा प्रश्नच नाही. म्हणजे गवताची व्यवस्था करणे आले.

सह्याद्रीवर मान्सूनचा भरपूर पाउस पडतो. या काळात डोंगर उतारांवर स्थानिक जंगली गवत भरभरून उगवतं.

सह्याद्रीमध्ये बहुतेक शेतकऱ्यांकडे भातखाचरांव्यतिरिक्त डोंगर उतारावरची किवा पठारावरची खाजगी राने आहेत. पण गवताला ऊन पण मिळायला हवं – त्यासाठी उतारावर वाढलेले सगळे स्थानिक जंगली वृक्ष पण तोडून विकून टाकले जातात. ज्याची सावली पडू शकते असं काहीच शिल्लक ठेवलं जात नाही. आता ऊन आणि पाणी दोन्हीची व्यवस्था झाली. पाऊस पडला की काही दिवसातच गवत उगवून सगळा उतार हिरवागार होतो. मग पावसाळ्यात हिरवा चारा कापून नेला जातो. त्या नंतरचा काही काळ हिरवं गवत कोवळं असेपर्यंत जनावरांना डोंगरावर नेऊन चारण्यात येतं.

जानेवारीच्या सुमारास जसं गवत जून होऊ लागतं तसं लगबगीनं त्याच्या पेंड्या कापून त्याच्या होळ्या (साठवणीचे ढिगारे) करण्यात येतात.

साधारण शिमग्याच्या सुमारास डोंगरावरचे उरलेले गवत सुकून पिवळे झाले की मग वाऱ्याची दिशा आणि जोर पाहून काडी लावून वणवा पेटवण्यात येतो. संपूर्ण उतार पेट घेतो. सुकलेलं गवत भराभर जळते त्याबरोबर गेल्या पावसाळ्यात निसर्गतः उगवून आलेली जंगलातील वृक्षांची रोपटी पण जळून भस्म होतात. संपूर्ण डोंगर करपून उजाड बोडका होतो. पण दुध उत्पादक आनंदात असतो, कारण वणव्याची राख पडल्यामुळे येत्या पावसात गवत जोमाने उगवणार याची त्याला खात्री असते. शिवाय सगळं रान जाळून घेतल्यामुळे मोठ्या होऊ शकणाऱ्या वृक्षांची रोपं पण जळून गेलेली असतात. सगळे डोंगर बोडके झाल्यामुळे वन्य प्राणी, पक्ष्यांना घरटी बांधणं सोडा, क्षणभर बसायला सुद्धा जागा शिल्लक नसते, दुर्दैवाने हा देखील शेतकऱ्यांच्या नजरेत फायदाच झाला.

सारांश – हजारो वर्षांपासून आपल्या परंपरेतला शेतकरी हा स्वतःला निसर्गाचा विश्वस्त समजून काम करत होता. निसर्गाचे सखोल निरीक्षण करून, निसर्गाचे नियम समजून घेऊन, त्यांचा आदर राखून त्याने स्वतःला आणि इतरांना जगवले.

आज शेतकरी हा निसर्गाचा कर्दनकाळ झाला आहे. शिवाय निसर्ग, पर्यावरण, संवर्धन हे केवळ शहरी पुस्तकी विद्वानांचे खूळ आहे, त्यांना सहलीला फिरायला यायचं आहे, वाघ पहायचा आहे, त्यासाठी आम्ही का 'विकासा'पासून वंचित राहू, असा सवाल शेतकऱ्यांचे पुढारी मांडतात आणि तो स्वीकारणं शेतकऱ्यासाठी सोयीस्करच असतं.

शहरात राहणाऱ्या, शेतीचा, निसर्गाचा गंध नसणाऱ्या, केवळ पैश्याभोवती संपूर्ण जीवनप्रवास आखलेल्या माणसांना आपण पीत असलेल्या दुधाची खरी किंमत कधीच कळत नाही. वास्तव हे आहे की सह्याद्रीत उत्पादन केलेले दुध, दही, तूप, लोणी, श्रीखंड ई. हे सह्याद्रीत वणवे पेटवून, निसर्गाची भयंकर नासाडी करूनच आपल्याला मिळते. त्याची अंशतः किंमत आपण आज भरतो, पण उर्वरित छुपी किंमत मात्र अजून न जन्मलेल्या पिढ्या भविष्यात भरणार आहेत – देशोधडीला लागून. पण या परिस्थितीसाठी निव्वळ शेतकऱ्याला दोष देता येईल का?